ePaper

## “पंतप्रधान मोदी हमीभावाची गॅरंटी का देत नाहीत?” बच्चू कडूंचा घरचा आहेर!



| वर्ष - 7 | अंक - 272 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | गुरुवार, दिनांक 15 फेब्रुवारी 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

### आतील पानांत


- मी म्हटलं, पैसे घे, धोनीने नकार दिला
- तुमच्या बरोबर झालंय का कधी असं?
- मी भारतमातेचा मोठा पुजारी!
- मोदी हमीभावाची गॅरंटी देत नाहीत?


# प्रफुल्ल पटेल यांना राज्यसभेची उमेदवारी!



## अजित पवार यांच्या राष्ट्रवादीकडून काही तांत्रिक कारणांमुळे निर्णय, प्रदेशाध्यक्ष तटकरे यांची माहिती

। मुंबई। महाईन्यूज

**अजित पवार यांच्या राष्ट्रवादीकडून प्रफुल पटेल यांना राज्यसभेची उमेदवारी देण्यात आलेली आहे. त्यांना राज्यसभेवर निवडून जाऊन केवळ दीड वर्ष झालेले असताना पुन्हा त्यांना उमेदवारी कशी काय? असा प्रश्न विचारला जात असताना काही तांत्रिक कारणांमुळे निर्णय घेण्यात आल्याची माहिती सुनील तटकरे यांनी दिली.**

राष्ट्रवादीकडून (अजित पवार गट) राज्यसभेसाठी प्रफुल पटेल यांना उमेदवारी देण्यात आलेली आहे. राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी त्यांच्या नावाची घोषणा केली. बुधवारी भाजपचे तीन आणि शिवसेना शिंदे गटाचा राज्यसभेचा उमेदवार जाहीर झाल्यानंतर राष्ट्रवादीची बैठक पार पडली. त्या बैठकीत प्रफुल पटेल यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आलं. आज दुपारी साडे बारा वाजता ते राज्यसभेचा अर्ज भरतील, असे तटकरे यांनी सांगितलं.

विशेष म्हणजे प्रफुल पटेल जून २०२२ मध्येच राज्यसभेवर निवडून गेले होते. परंतु त्यांना राजीनामा द्यायला सांगून पुनश्च अर्ज भरण्याच्या सूचना पक्षाने दिलेल्या आहेत. त्यांच्या रिक्त होणाऱ्या जागेवर मे महिन्यात निवडणूक होईल, त्यावेळी आम्ही दुसरा उमेदवार देऊ, असंही सुनील तटकरे यांनी सांगितलं. काही तांत्रिक गोष्टींमुळे पक्षाने हा निर्णय घेतल्याचंही ते म्हणाले.

भारतीय जनता पक्षाने राज्यसभा निवडणुकीसाठी त्यांच्या उमेदवारांची नावे जाहीर केली आहेत. नुकतेच भाजपमध्ये प्रवेश केलेले ज्येष्ठ नेते अशोक चव्हाण त्याचबरोबर मेधा कुलकर्णी आणि अजित गोपछडे यांना राज्यसभेची उमेदवारी देण्यात आलेली आहे. दुसरीकडे विद्यमान केंद्रीय मंत्री नारायण राणे यांचा पत्ता मात्र भाजपने कापलेला आहे. भाजपचे सरचिटणीस विनोद तावडे तसेच पंकजा मुंडे यांच्या नावाचीही चर्चा होती. मात्र पुन्हा एकदा त्यांना 'वेटिंग' करावी लागणार आहे.

### शिंदे गटाकडून देवरा राज्यसभेवर जाणार

» मिलिंद देवरा हे शिंदे गटाकडून राज्यसभेचा अर्ज भरतील. एकेकाळी दक्षिण मुंबईचे प्रतिनिधित्व करणारे देवरा आता शिंदे गटातून राज्यसभेत जातील. दक्षिण मुंबई देशातील श्रीमंत लोकसभा मतदारसंघांपैकी एक आहे.

# मी जर मेलो तर मला असंच सरकारच्या दारात नेऊन टाका

## मनोज जरांगे पाटील: गेल्या काही महिन्यांपासून सातत्याने आंदोलनं, उपोषणं सुरुच

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मराठा समाजाच्या मागण्या मान्य करत राज्य सरकारने काढलेल्या अधिसूचनेचं कायद्यात रुपांतर करावं या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील बेमुदत उपोषणाला बसले आहेत. १० फेब्रुवारीपासून मनोज जरांगे पाटील यांनी उपोषण सुरु केलं आहे. त्यांच्या उपोषणाचा आजचा पाचवा दिवस आहे. कालपासून जरांगे यांची प्रकृती खालावली आहे. परंतु, त्यांनी उपचार घेण्यास नकार दिला. मनोज जरांगे यांच्या नाकातून रक्तस्त्राव होत असल्याचं त्यांच्याबरोबर असलेल्या आंदोलकांनी सांगितलं.**



नोंदी असलेल्या मराठा कुटुंबांना कुणबी जातप्रमाणपत्र द्यावं आणि प्रमाणपत्र असलेल्या व्यक्तीच्या शपथपत्रासह त्यांच्या सगेसोयऱ्यांचा आरक्षणात समावेश करावा, तसेच सरकारने काढलेल्या अधिसूचनेचं कायद्यात रुपांतर करावं या प्रमुख मागण्यांवर मनोज जरांगे पाटील ठाम आहेत. मराठा समाजाला आरक्षण मिळावं या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील गेल्या काही महिन्यांपासून सातत्याने आंदोलनं आणि उपोषणं करत आहेत. २६ जानेवारी रोजी जरांगे पाटील यांच्या नेतृत्वात मराठा समाजाचा मोर्चा मुंबईच्या वेशीवर (वाशी, नवी मुंबई) दाखल झाला होता. त्यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे मराठा आंदोलकांना सामोरे गेले आणि त्यांनी मराठा समाजाच्या सर्व मागण्या मान्य करत असल्याचं जाहीर केलं. तसेच त्यासंबंधी काढलेली अधिसूचना जरांगे पाटील यांना सोपवली. परंतु, त्याची अद्याप अंमलबजावणी सुरू झालेली नाही. त्यामुळेच मनोज जरांगे पाटील पुन्हा एकदा बेमुदत उपोषणाला बसले आहेत.

मनोज जरांगे यांच्यावर सध्या आंदोलकांनी आणि डॉक्टरांनी जबरदस्तीने सलाईन लावून उपचार सुरू केले आहेत. सकाळी त्यांच्या नाकातून रक्तस्राव झाला होता. तर, दुपारपासून त्यांना पोटदुखी सुरू झाली आहे. त्यांची प्रकृती खालावत चालल्यामुळे अंतरवाली सराटी येथे आंदोलनस्थळी त्यांच्या समर्थकांची आणि आंदोलकांची गर्दी वाढू लागली आहे.

### मनोज जरांगे यांचं भावनिक आवाहन

» दरम्यान, मनोज जरांगे पाटील यांनी आंदोलकांना भावनिक आवाहन केलं आहे. ते म्हणाले, मी जर मेलो तर मला असंच सरकारच्या दारात नेऊन टाका. मी मेल्यावर या सरकारला धारेवर धरा. सरकारने आपल्याला येत्या १८ किंवा १९ फेब्रुवारीपर्यंत आरक्षण दिलं नाही तर आपण मुंबईला जाऊ. सरकार आपल्यासाठी इथे येत नाहीये, तर आपण तिथे जाऊ. मी मेलो तर या सरकारला सोडू नका. मला तिकडे नेऊन टाका. आपण १८ फेब्रुवारीपर्यंत वाट बघू. सरकार आरक्षणाच्या कायद्याची अंमलबजावणी कधी करणार हे त्यांनी आधी आम्हाला सांगावं, त्यानंतर मी उपचार घेण्यास तयार आहे.

# पक्ष विलीनीकरणाच्या वृत्ताचे खंडन!

## » पवार यांच्या मोदीबाग येथील कार्यालयात पदाधिकाऱ्यांची बैठक

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**राज्यात राजकीय स्थित्यंतरे होत असतानाच 'राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार' पक्ष काँग्रेसमध्ये विलीन होणार असल्याची चर्चा बुधवारी या पक्षाच्या बैठकीनंतर रंगली. मात्र पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांनी विलीनीकरणाचा मुद्द्याचे तातडीने खंडन केले.**



पक्षाचे नाव आणि निवडणूक चिन्ह यासाठी सर्वोच्च न्यायालयात लढा सुरू असला तरी, प्रदीर्घ न्यायालयीन प्रक्रियेची शक्यता असल्याने नवीन नाव आणि चिन्हासह आगामी लोकसभा निवडणुकीला सामोरे जाण्यासंदर्भात ही बैठक होती. तशी सूचना पवार यांनी केल्याचा दावा करण्यात आला. दरम्यान, काँग्रेसला न दुखविण्याची सूचनाही पवार यांनी या बैठकीत केल्याचे सांगण्यात आले.आगामी लोकसभा आणि त्यानंतर होणाऱ्या विधानसभा निवडणुकांच्या अनुषंगाने शरद पवार यांच्या मोदीबाग येथील कार्यालयात पदाधिकाऱ्यांची बैठक झाली. पक्ष आणि चिन्ह गेल्यानंतरची पक्षाची ही पहिलीच मोठी बैठक होती. खासदार सुप्रिया सुळे, वंदना चव्हाण, श्रीनिवास पाटील, डॉ. अमोल कोल्हे, आमदार रोहित पवार, संदीप क्षीरसागर, माजी मंत्री अनिल देशमुख, राजेश टोपे, शशिकांत शिंदे, बाळासाहेब पाटील यांच्यासह अन्य प्रमुख पदाधिकारी या बैठकीला उपस्थित होते. या बैठकीनंतर पुणे जिल्ह्यातील एका माजी पदाधिकाऱ्याने काँग्रेसमध्ये विलीनीकरणासंदर्भातील चर्चा या बैठकीत झाल्याचा दावा एका वृत्तवाहिनीशी बोलताना केला. त्यानंतर विलीनीकरणाचा मुद्दा रंगण्यास सुरुवात झाली. त्याची चर्चा सुरू असतानाच पक्षाच्या नेत्यांनी मात्र त्याचे तातडीने खंडन केले. सुप्रिया सुळे, रोहित पवार, डॉ. अमोल कोल्हे यांनी विलीनीकरणाच्या संदर्भात कोणतीही चर्चा झाली नसल्याचे सांगितले. केंद्रात आणि राज्यात सुरू असलेली दडपशाही जनता पहात आहे. त्यामुळे जनतेपर्यंत पोहोचून त्यांना धीर द्यायचा आहे. नवे पक्ष आणि निवडणूक चिन्ह घेऊन निवडणुकीला सामोरे जायचे आहे, असा निर्धार या बैठकीत व्यक्त करण्यात आल्याचा दावा नेत्यांकडून करण्यात आला.दरम्यान, आगामी निवडणुकीत काँग्रेसला न दुखविण्याची सूचना केल्याची माहितीही काही पदाधिकाऱ्यांनी दिली. महाविकास आघाडीतील मित्र पक्षांशी सुसंवाद साधा, असे सांगणे म्हणजे विलीनीकरण होत

> “ पक्षाचा लढा सत्तेसाठी नसून, अस्तित्वासाठी आहे. त्यामुळे कुठेही विलीन होण्याचा प्रश्नच नाही. आगामी निवडणुकीत शरद पवार यांच्या नेतृत्वात लढून ऐतिहासिक विजय मिळविला जाईल. इंडिया आघाडीचा पुण्यात पुढील आठवड्यात मेळावा होणार आहे.
> **– प्रशांत जगताप,** शहराध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गट

नाही, असा दावाही करण्यात आला.पक्षाचे नाव आणि निवडणूक चिन्ह यासाठी सर्वोच्च न्यायालयात लढा सुरू असला तरी, प्रदीर्घ न्यायालयीन प्रक्रियेची शक्यता असल्याने नवीन नाव आणि चिन्हासह आगामी लोकसभा निवडणुकीला सामोरे जाण्यासंदर्भात ही बैठक होती. तशी सूचना पवार यांनी केल्याचा दावा करण्यात आला. दरम्यान, काँग्रेसला न दुखविण्याची सूचनाही पवार यांनी या बैठकीत केल्याचे सांगण्यात आले.आगामी लोकसभा आणि त्यानंतर होणाऱ्या विधानसभा निवडणुकांच्या अनुषंगाने शरद पवार यांच्या मोदीबाग येथील कार्यालयात पदाधिकाऱ्यांची बैठक झाली. पक्ष आणि चिन्ह गेल्यानंतरची पक्षाची ही पहिलीच मोठी बैठक होती. खासदार सुप्रिया सुळे, वंदना चव्हाण, श्रीनिवास पाटील, डॉ. अमोल कोल्हे, आमदार रोहित पवार, संदीप क्षीरसागर, माजी मंत्री अनिल देशमुख, राजेश टोपे, शशिकांत शिंदे, बाळासाहेब पाटील यांच्यासह अन्य प्रमुख पदाधिकारी या बैठकीला उपस्थित होते. या बैठकीनंतर पुणे जिल्ह्यातील एका माजी पदाधिकाऱ्याने काँग्रेसमध्ये विलीनीकरणासंदर्भातील चर्चा या बैठकीत झाल्याचा दावा एका वृत्तवाहिनीशी बोलताना केला. त्यानंतर विलीनीकरणाचा मुद्दा रंगण्यास सुरुवात झाली. त्याची चर्चा सुरू असतानाच पक्षाच्या नेत्यांनी मात्र त्याचे तातडीने खंडन केले. सुप्रिया सुळे, रोहित पवार, डॉ. अमोल कोल्हे यांनी विलीनीकरणाच्या संदर्भात कोणतीही चर्चा झाली नसल्याचे सांगितले. केंद्रात आणि राज्यात सुरू असलेली दडपशाही जनता पहात आहे. त्यामुळे जनतेपर्यंत पोहोचून त्यांना धीर द्यायचा आहे. नवे पक्ष आणि निवडणूक चिन्ह घेऊन निवडणुकीला सामोरे जायचे आहे.

# चंद्रकांतदादांचा मुक्काम कोल्हापूर सोडून पुण्यातच!

## » भाजपने एका दगडामध्ये अनेक पक्षी मारल्याचे बोलले जात आहे

। पुणे ।महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**संपूर्ण देशातील भाजपकडून राज्यसभा उमेदवार घोषित करण्यात आले, तरी महाराष्ट्राची मात्र यादी काही येत नव्हती. ती यादी अखेर आली असून भाजपकडून तीन नावांवर शिक्कामोर्तब करण्यात आलं आहे. यामध्ये काँग्रेसला सोडचिट्ठी देत पक्षांमध्ये आलेल्या अशोक चव्हाण यांना अपेक्षितपणे राज्यसभेची उमेदवारी देण्यात आली आहे.**

त्याचबरोबर कोथरूडच्या माजी आमदार मेधा कुलकर्णी ) यांना सुद्धा उमेदवारी देण्यात आली आहे. तिसरे उमेदवार डॉक्टर अजित गोपछडे यांना देण्यात आली आहे.दुसरीकडे, भाजपमध्ये अनेक नावे चर्चेत असताना मेधा कुलकर्णी यांनी राज्यसभेचे उमेदवारीमध्ये बाजी मारल्याने राजकीय भूवया सुद्धा उंचावले गेल्या आहेत. मात्र, मेधा कुलकर्णी यांची उमेदवारी निश्चित करताना भाजपने एका दगडामध्ये अनेक पक्षी मारल्याचे बोलले जात आहे. पुणे हा भाजपचा बालेकिल्ला मानला जातो. मात्र, त्याठिकाणी गेल्या काही दिवसांपासून नाराजी दिसून आली होती. कोथरूडमध्ये 2014 च्या निवडणुकीत मेधा कुलकर्णी या



तब्बल 64 हजार मतांनी निवडून येऊन सुद्धा 2019 मध्ये त्यांना उमेदवारी नाकारण्यात आली. या ठिकाणी भाजपचे नेते चंद्रकांत पाटील (Chandrakant Patil) यांना रिंगणात उतरविण्यात आले. या ठिकाणी चंद्रकांत पाटील यांनी विजय खेचून आणला. मात्र, त्यांना बराच संघर्ष करावा. यानंतर कोथरूडची हक्काची जागा गेल्याने मेधा कुलकर्णी या सातत्याने नाराज होत्या. त्यांनी आपली नाराजी स्पष्टपणे राज्यस्तरातील नेतृत्वापासून ते

### पाटील यांच्यासाठी सुरक्षित?

» मेधा कुलकर्णी या नाराज असल्याने 2024 च्या निवडणुकीमध्ये पुन्हा चंद्रकांत पाटील यांना उतरवण्याचा निर्णय झाल्यास तर ती नाराजी पक्षाला मोठी महागात पडू शकली असती. त्यामुळे मेधा कुलकर्णी यांची नाराजी दूर करून एक प्रकारे कोथरूड हा मतदारसंघ पाटील यांच्यासाठी सुरक्षित केला आहे.

पार केंद्रीय नेतृत्वापर्यंत बोलून दाखवली होती. विधानपरिषद आणि राज्यसभा निवडणुकीमध्येही त्यांच्याकडे दुर्लक्ष करण्यात आले होते. दुसरीकडे, कसबा पोटनिवडणुकीत मुक्ता टिळक यांच्या कुटुंबातील उमेदवारी न देता हेमंत रासने यांना उमेदवारी देण्यात आली होती. त्यामुळे एक प्रकारे ब्राह्मण समाजाकडे दुर्लक्ष तरी होत नाही ना? अशी सुद्धा चर्चा भाजपमध्ये आणि पुण्यामध्ये सुरू होती. मात्र आता राज्यसभेच्या माध्यमातून मेधा कुलकर्णी यांची नाराजी दूर केल्याने भाजपने एक प्रकारे त्यांचं राजकीय पुनर्वसन केल्याचे बोलले जात आहे. कोथरूडमधून विद्यमान आमदार चंद्रकांत पाटील आहेत. त्यामुळे त्यांचा सुद्धा या राज्यसभेच्या निवडणुकीतून मार्ग प्रशस्त केला आहे का? अशी सुद्धा चर्चा आहे.

# 1100 जाहिरात फलकधारकांना नोटीस!

## थकीत शुल्काची रक्कम 29 फेब्रुवारीपर्यंत भरा; अन्यथा महापालिकेचा कारवाईचा इशारा

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महापालिकेच्या आकाशचिन्ह व परवाना विभागाने शहरातील ११०० जाहिरातफलकधारकांना (होर्डिंग) थकीत शुल्क भरण्यासाठी नोटीस दिली आहे. थकीत शुल्काची रक्कम २९ फेब्रुवारीपर्यंत भरावी अन्यथा फलक अनधिकृत गृहीत धरून कारवाईचा इशारा दिला आहे.**



शहरात महापालिकेच्या जागेत जाहिरातफलक उभारले जातात. तसेच, खासगी जागामालकांना जाहिरातफलक उभारण्यास परवानगी दिली जाते. हेच महापालिकेच्या आकाशचिन्ह परवाना विभागाच्या उत्पन्नाचे साधन आहे. अनधिकृतपणे फलक उभारून जाहिरातदार महापालिकेचे उत्पन्न बुडवतात. तसेच, परवाना घेतल्यानंतरही शुल्क भरले जात नाही.

दरम्यान, १७ एप्रिल २०२३ मध्ये किवळेतील दुर्घटनेनंतर सर्वच जाहिरात फलकांचा स्थापत्यविषयक अहवाल घेण्यात आला. परंतु, फलक परवाना नूतनीकरणाची प्रक्रिया थांबविण्यात आली होती. अखेर आकाशचिन्ह व परवाना विभागाने ही कार्यवाही सुरू केली.

त्यानुसार ११०० जाहिरातफलकधारकांना मागणी (डिमांड) नोटीस देण्यात आली आहे. त्यांना शुल्काची रक्कम जमा करण्यासाठी २९ फेब्रुवारीची मुदत देण्यात आली आहे. हे नूतनीकरण १ एप्रिल २०२३ ते ३१ मार्च २०२४ या आर्थिक वर्षाच्या कालावधीसाठी होणार आहे. त्याप्रमाणे मागणी नोटीस देण्यात आली आहे. शुल्क जमा केल्यानंतर परवान्याचे नूतनीकरण होणार आहे. ज्या फलकाचा जाहिरात परवाना नूतनीकरण होणार नाही तो फलक अनधिकृत गणला जाऊन काढून टाकण्याची कारवाई केली जाणार आहे.

### 19 कोटी उत्पन्न अपेक्षित

आकाशचिन्ह व परवाना विभागाला २०२२-२३ या आर्थिक वर्षात १७ कोटी २४ लाख ४४ हजार रुपयांचे उत्पन्न मिळाले होते. या वर्षी जाहिरातफलक, उद्योग परवाने आणि नूतनीकरणातून विभागाला १९ कोटींचे उत्पन्न मिळेल, असा प्रशासनाचा अंदाज आहे. जाहिरातफलकाच्या परवान्यांचे नूतनीकरण करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. मागणी नोटीस बजावली आहे. फलकधारकांना २५ हजार ते एक लाख रुपयांचे शुल्क भरावे लागणार आहे. त्यानंतरच परवान्यांचे नूतनीकरण होईल, असे आकाशचिन्ह व परवाना विभागाचे उपायुक्त संदीप खोत यांनी सांगितले.


# महापालिका प्रशासनाच्या खाबुगिरीचे 'इमले'

## बोगस परवानग्यांमुळे शहरात धोकादायक बांधकामे, अमोल थोरात यांचा गंभीर आरोप

। पिंपरी।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**वाकड येथे तीन मजली इमारत कलल्यामुळे धोकादायक झाली होती. त्यामुळे हे बांधकाम जमीनदोस्त करावे लागले. शहरातील बांधकाम प्रकल्पांना नियमानुसार परवानगी देणे आवश्यक आहे. तांत्रिक बाबी व सुरक्षेच्या दृष्टीकोनातून बांधकाम अभियांत्रिकीचे निकष पायदळी तुडवत परवानगी दिल्यानेच अशी धोकादायक बांधकामे शहरात होत आहेत. महापालिका प्रशासनाकडून खाबुगिरीचे 'इमले' उभारल्यानेच हे प्रकार घडत आहेत, असा आरोप भाजपाचे अमोल थोरात यांनी केला आहे.**







वाकड येथे तीन मजली इमारत धोकादायकपद्धतीने उभारण्यात आली. महापालिकेला ही इमारत पाडावी लागली. ही मोठी नामुष्की असून, बांधकाम अभियांत्रिकी क्षेत्रासाठी लाजीरवाणी बाब आहे. याला पूर्णपणे महापालिका प्रशासन जबाबदार आहे, असा आरोप अमोल थोरात यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकातून केला आहे.

शहरातील बांधकामांना परवानगी देण्यासाठी महापालिकेकडे स्वतंत्र बांधकाम परवाना विभाग आहे. महापालिका हद्दीतील प्रत्येक बांधकाम प्रकल्पाला परवाना विभागाकडून परवानगी घेणे आवश्यक असते. वाकड येथील 'त्या' बांधकामाला देखील परवानगी देण्यात आल्याचे सांगण्यात येत आहे. अशी परवानगी देताना महापालिका परवानगी विभागातील संबंधित अधिकारी, वास्तू विशारद, आरेखक, बांधकाम अभियांत्रिकीशी संबंधित अधिकारी व कर्मचारी यांनी या प्रकल्पाबाबत परवानगी देताना नियमांकडे दुर्लक्ष केले. तसेच बांधकामांसाठी आवश्यक निकषांना बाजूला सारत परवानगी दिली. परिणामी बांधकाम धोकादायक होऊन इमारत पाडावी लागली.

महापालिका आयुक्त म्हणून शेखर सिंह यांचा संबंधित विभागावर वचक नसल्याचे दिसून येते. तसेच महापालिका प्रशासनाकडून खाबुगिरीचे हे 'इमले' त्यांच्याच संमतीने उभारण्यात येत असल्याचे दिसून येते. यापूर्वीही महापालिकेच्या विविध विभागांमधील गैरप्रकार चव्हाट्यावर आले. मात्र, तरीही महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी संबंधित अधिकाऱ्यांना पाठीशी घातले. तसेच स्वत: देखील काही चुकीचे निर्णय घेऊन शहरवासीयांच्या पैशांची उधळपट्टी केली. प्रयोग म्हणून काही प्रकल्पांसाठी मोठा खर्च केला. मात्र, प्रत्यक्षात हे प्रकल्प पूर्णपणे फसले.

महापालिका प्रशासनातील खाबुगिरी वाकड येथील पाडण्यात आलेल्या इमारतीच्या प्रकरणावरून समोर आली आहे. याप्रकरणी महापालिका आयुक्तांनी संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करावी. तसेच इतर विभागांतील खाबुगिरी मोडीत काढावी, अशी मागणी अमोल थोरात यांनी प्रसिद्धी पत्रकातून केली आहे.

### वाकडमध्ये वाकलेली इमारत अखेर जमीनदोस्त

दाट लोकवस्ती असलेल्या वाकड भागात बांधकाम करण्यात येत असतानाच वाकलेली इमारत अखेर महापालिकेने पाडली. दरम्यान, धोकादायक काम केल्यामुळे विकासकाला नोटीस दिली जाणार आहे. पाडण्याचा खर्च वसूलही केला जाणार आहे. वाकड पोलीस ठाण्यासमोर बांधकाम व्यावसायिक सुनील दोलवानी यांच्या तीन मजली (G+3) इमारतीचे बांधकाम सुरू आहे. इमारतीचे जवळपास सर्व काम पूर्ण होत आले आहे. मंगळवारी रात्री साडे दहाच्या सुमारास या इमारतीच्या बांधकामाने आपली जागा सोडली. त्यामुळे इमारत वाकली गेली. या भागात मोठ्या प्रमाणात लोकवस्ती असल्याने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले. राहुल सरोदे यांनी थेरगाव उप अग्निशमन केंद्राला याबाबत माहिती दिली. त्यानुसार पिंपरी आणि थेरगाव येथील अग्निशमन बचाव पथक घटनास्थळी तात्काळ दाखल झाले. दरम्यान पोलिसांना देखील पाचारण करण्यात आले. वाकलेली इमारत पाहण्यासाठी बघ्यांनी मोठी गर्दी केली होती. इमारत पडणार अशी भीती सर्वजण व्यक्त करत होते.




**कतारमध्ये प्रथम अटक व नंतर देहान्त शासन ठोठावल्या गेलेल्या सात माजी भारतीय नौदल अधिकाऱ्यांची तसेच एका नाविकाची घरवापसी, हे परराष्ट्र खात्याची मुत्सद्देगिरी तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी व कतारी आमिर तमिम बिन हमाद अल थानी यांच्या मैत्रीचे यश मानावे लागेल. इस्रायलसाठी हेरगिरी केल्याबद्दल या अधिकाऱ्यांना अटक व देहान्ताची शिक्षा सुनावली गेली होती असा एक अंदाज आहे.**

# मैत्री अधिक मुत्सद्देगिरी



हे अधिकारी कतारी नौदलासाठी नेमण्यात आलेल्या सल्लागार कंपनीसाठी काम करत होते. जुलै २०२२ मध्ये त्यांना अटक करण्यात आली. मग ऑक्टोबर २०२३ मध्ये त्यांना देहान्त शासन ठोठावण्यात आले. डिसेंबरमध्ये या सर्वांची देहदंडाची शिक्षा माफ करण्यात आली. मग रविवारी रात्री एकदम सुटकाच करून त्यांची मायदेशी पाठवणी झाली. या सगळ्या काळात संबंधित अधिकाऱ्यांचा नेमका गुन्हा काय किंवा आता त्यांची थेट सुटकाच कशी झाली, याविषयी जाहीर भाष्य कतार किंवा भारततर्फे अद्याप करण्यात आलेले नाही. त्यामुळे या संपूर्ण घटनेचे विश्लेषण करताना तर्कांचाच आधार घ्यावा लागतो.परंतु गेल्या काही वर्षांमध्ये मोजकी श्रीमंत अरब राष्ट्रे आणि भारत यांच्यातील मैत्रीबंध दृढ झाले हे दाखवण्यासाठी कोणत्याही तर्काची गरज नाही. वैयक्तिक स्नेहसंबंध हे मोदी यांच्या परराष्ट्रनीतीचे प्रधान सूत्र आहे. याचे बरे-वाईट असे दोन्ही परिणाम दिसून आले आहेत हे खरे. पण यातूनच अनेक जागतिक नेते आणि सत्ताधीशांशी ते थेट संवाद साधू शकतात आणि अनेक महत्त्वाचे जटिल प्रश्न मुत्सद्दी संपर्काच्या गुंतागुंतीमध्ये न अडकता सोडवू शकतात. कतारमधून भारतीयांची सुखरूप सुटका हा या नीतीचा परमावधी हे नि:संशय. आज घडीला सौदी अरेबिया, संयुक्त अरब अमिराती आणि कतार हे आखातातील सर्वांत प्रभावी आणि श्रीमंत देश. या तिन्ही देशांशी म्हणजे या देशांच्या सत्ताधीशांशी मोदी यांचे वैयक्तिक संबंध व संवाद आहे. यांतील यूएई आणि कतारमध्ये भारतीय कौशल्यधारक सल्लागार आणि इतर प्रकारच्या नोकरदारांची संख्या प्रचंड आहे. कतार हा तसा चिमुकला देश, पण तेथे जवळपास साडेसात ते आठ लाख भारतीय राहतात. त्यांचे तेथील अर्थव्यवस्थेतील योगदान मोठे आहे. कतारच्या सत्ताधीशांना याची जाणी असेलच. पण ज्या प्रकारे शिक्षा माफ झाली, त्याला केवळ हे कारण प्रभावक ठरलेले नाही. कारण दोन्ही देशांमध्ये आरोपींच्या आदानप्रदानाबाबत चर्चा झालेली असली, तरी करार झालेला नाही. कतार हा जगातील प्रमुख नैसर्गिक वायू निर्यातदार आहे आणि भारताची ऊर्जाभूक भागवण्यासाठी हा वायू महत्त्वाचा ठरतो. या घटकाची व्याप्ती आणि प्रभाव नजरेआड करण्यासारखा नाही. भारताच्या एकूण द्रवीभूत नैसर्गिक वायूच्या (एलएनजी) आयातीपैकी ४० टक्के कतारमधून होते. ही आयात २०४८ पर्यंत सुरू राहावी या दृष्टीने त्या देशाबरोबर गेल्याच आठवड्यात ७८ अब्ज डॉलरचा (जवळपास साडेसहा हजार कोटी रुपये) करार करण्यात आला. सौदी अरेबियाला एकीकडे इस्लामी जगताचे नेतेपद हवे आहे, त्याच वेळी खनिज तेलनिर्भर अर्थव्यवस्थेच्या वृद्धीसाठी नवे पर्याय निर्माण करायचे आहेत. यूएईनेही निव्वळ खनिज तेलापलीकडे आपल्या अर्थव्यवस्थेचा पसारा वाढवण्यास सुरुवात केली आहे. या दोन्ही देशांपेक्षा लहान असूनही कतारने या बाबतीत त्यांच्यावर आघाडी घेतली आहे. हा महत्त्वाकांक्षी देश आहे. यासाठी इराणच्या बरोबरीने नैसर्गिक वायू प्रकल्प विकसित करत असताना, काही काळ बड्या अरब देशांशी संघर्षाची भूमिका घेण्यासही कतारने मागेपुढे पाहिले नव्हते. त्याचप्रमाणे, वृत्तमाध्यमे आणि जिहादी पुंडांशी संपर्कात राहण्याचे आणि त्यांच्या वतीने वाटाघाटी करण्याचे कसब असे दोन स्वतंत्र प्रभावक कतार खुबीने वापरतो. त्यामुळेच अशा व्यामिश्र जातकुळीच्या देशाशी वाटाघाटी करून आठ भारतीयांची सुखरूप सुटका करणे ही कामगिरी कौतुकपात्र ठरते. यानिमित्ताने पाकिस्तानी तुरुंगात खितपत पडलेले भारतीय अधिकारी कुलभूषण जाधव यांच्या सुटकेची मागणीही जोर धरू शकते. कतार आणि पाकिस्तान या दोन्ही देशांशी असलेल्या भारताच्या संबंधांमध्ये मूलभूत फरक आहे हे खरेच. परंतु परिस्थिती जितकी प्रतिकूल, तितका मुत्सद्देगिरीचा कस लागतो हेही खरे.

## संपादकीय »

### राजभवनी कंडूशमन

***ताज्या तमिळनाडू प्रकरणात राज्य सरकार आपणास विचारत नाही आणि केंद्रसुद्धा उघड काही पाठिंबा देत नाही, हे एव्हाना महामहीम रवींस ध्यानी आलेच असेल...***

तमिळनाडूचे राज्यपाल आर. एन. रवी हे मोठे भारीच गृहस्थ दिसतात. आपली घटनादत्त परंपरा अशी की विधिमंडळात वर्षातील पहिल्या अधिवेशनास संबंधित राज्याचे राज्यपाल संबोधित करतात आणि संसदेच्या वर्षातील पहिल्या सत्राची सुरुवात राष्ट्रपतींच्या अभिभाषणाने होते. वस्तुत: जरी ही भाषणे राष्ट्रपती वा राज्यपाल यांची असतात असे मानले जात असले तरी प्रत्यक्षात ती अनुक्रमे केंद्र व राज्य मंत्रिमंडळाने लिहिलेली असतात. त्या त्या मंत्रिमंडळांच्या बैठकीच्या पटलावर ही भाषणे ठेवली जातात आणि त्यास रीतसर मंजुरी घेतली जाते. त्यानंतर त्याचा मसुदा राष्ट्रपती/राज्यपाल यांस दिला जातो आणि मग या घटनात्मक पदांवरील व्यक्ती त्याचे सदनात वाचन करतात. राष्ट्रपती वा राज्यपाल हे केंद्र आणि राज्य सरकारांचे केवळ घटनात्मक प्रमुख असतात आणि त्याखेरीज त्यांस अन्य अधिकार असणे अपेक्षित नसते.

मराठ्यांना शांत करण्यात सध्या तरी सरकारला यश मिळाल्याचे दिसते आहे. परंतु अधिसूचनेच्या मसुद्यामार्फत जात ओळख निर्माण करण्याचा जो नवीन मार्ग आखण्यात आला आहे, त्यामुळे सत्ताधारी मराठ्यांच्या हाती ओबीसी प्रवर्गात घुसखोरी करण्याचे शक्तिशाली साधन प्राप्त झाल्याने ओबीसींमध्ये अस्वस्थता निर्माण झालेली आहे.

# मराठ्यांचे कुणबीकरण यशस्वी कसे होणार?



महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी 'मसुदा अधिसूचनेद्वारे' कुणबी जातीच्या ओळखीची नोंद असलेल्या मराठ्यांना इतर मागासवर्गीय (ओबीसी) आरक्षणाची घोषणा करून नवी मुंबईत येऊन थडकलेल्या भव्य मराठा मोर्चाचा समारोप करण्यात आला. पुन्हा १० फेब्रुवारीपासून उपोषण सुरू केल्यामुळे दिसते. अधिसूचना मसुदयाच्या अंमलबजावणीसाठी हे उपोषण आहे आणि मराठ्यांच्या आरक्षणाला विरोध केल्यास मंडल आयोगाच्या अहवालाला आव्हान देण्याचा इशारा देण्यात आला आहे. ओबीसी आरक्षणाची मराठ्यांची मागणी १९९०च्या दशकापासून, शेती-अरिष्ट, जमिनीचे तुकडीकरण, रोजगाराचे प्रश्न आणि नव-उदारमतवादी आर्थिक धोरणांचे आक्रमण यामुळे सामाजिक-आर्थिक विषमतेचे स्वरूप अधिक गंभीर रूप धारण करू लागल्याने, आणि मराठ्यांना त्याची झळ बसू लागल्याने मराठ्यांनी पुन्हा एकदा आपण 'मूळ कुणबी' असल्याचा दावा करत ओबीसी दर्जा मिळविण्याचा प्रयत्न केला. या समस्यांना प्रतिसाद देत नोकरी आणि शिक्षणात महाराष्ट्र सरकारने मराठ्यांसाठी वेगळे आरक्षण देऊ केले. तथापि सर्वोच्च न्यायालयाने २०२१ मध्ये मागासवर्गीय आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा ओलांडल्याचे कारण देत मराठ्यांना आरक्षण नाकारले. मग वेगळ्या आरक्षणाची मागणी बाजूला ठेवून थेट ओबीसी कोट्यात (१९%) कुणबी असल्याचा दावा करत आरक्षणाची मागणी मराठ्यांनी केली. गेल्या वर्षी ऑगस्टमध्ये जरांगे-पाटील यांनी पहिल्यांदा, निजाम काळात कुणबी नोंदी असलेल्या मराठ्यांना ओबीसी आरक्षण मिळावे यासाठी उपोषण सुरू केले. नंतर, या मागणीचे स्वरूप बदलले आणि संपूर्ण महाराष्ट्रात इंग्रजांच्या काळात कुणबी नोंदी असलेल्या मराठ्यांना आरक्षण मिळावे अशी मागणी होऊ लागली. अखेरीस, संपूर्ण राज्यभरातील 'सरसकट' मराठ्यांना ओबीसी आरक्षण मिळावे अशी मागणी रेटून करण्यात आली. म्हणूनच इथे प्रथमतः मराठा-कुणबी जातीच्या समूहाच्या इतिहासाचा संक्षिप्त आढावा घेणे आवश्यक आहे. मराठा साम्राज्यातून पुढे आलेल्या मराठा या प्रादेशिक ओळखीचे रूपांतर ब्रिटिश काळात एका जातीत झाले. सुरवातीला जेव्हा ब्रिटिशांनी त्यांचे रेस (वंश) किंवा ट्राईब असे वर्गीकरण केले तेव्हा त्यांनी मराठ्यांमध्ये दोन वर्ग पहिले – शहाण्णव कुळी मराठ्यांचा अभिजन राजेशाही वर्ग आणि आणि पशुपालक आणि शेतकरी कुणबी जातींनी बनलेला सामान्य वर्ग. शेती हा व्यवसाय अनेक जाती करत असल्यामुळे कुणबी जातीत इतर खालच्या जातींनी समाविष्ट होणे शक्य होत आलेले आहे. हेच विधान मराठा जातीसाठीही लागू होते.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# मोदी हमीभावाची गॅरंटी देत नाहीत?

## शेतकऱ्यांवर केलेल्या हल्ल्याचा निषेध करतो : आ. बच्चू कडू

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिकांना हमीभाव मिळावा या प्रमुख मागणीसह इतर काही मागण्या घेऊन पंजाब आणि हरियाणातील शेतकऱ्यांनी आंदोलन सुरू केलं आहे. या शेतकऱ्यांनी राजधानी दिल्लीच्या दिशेने मोर्चा काढला आहे. परंतु, शेतकऱ्यांचा हा मोर्चा रोखण्यासाठी दिल्लीच्या सीमेवर पोलिसांनी बळाचा वापर केला. पोलिसांनी शेतकऱ्यांवर लाठीहल्ला केला, तसेच जमाव पांगवण्यासाठी अश्रूधुराचा मारा मारा केला. या घटनेचा देशभरातून निषेध व्यक्त केला जात आहे.**



दरम्यान, सत्ताधारी भाजपाच्या मित्रपक्षांनीही यावरून नाराजी व्यक्त केली आहे. महाराष्ट्रातील भाजपाप्रणित महायुतीतला पक्ष प्रहार जनशक्ति पार्टीचे प्रमुख आणि आमदार बच्चू कडू यांनीदेखील शेतकऱ्यांवरील हल्ल्याचा निषेध केला आहे. दरम्यान, बच्चू कडू यांनी काही वेळापूर्वी प्रसारमाध्यमांशी बातचीत केली. यावेळी ते म्हणाले, केंद्र सरकारने शेतकऱ्यांवर केलेल्या हल्ल्याचा मी निषेध करतो. पिकांना हमीभाव मिळावा यासाठी शेतकरी आंदोलन करत आहेत. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे, पंतप्रधान नरेंद्र मोदी अनेक गोष्टींची गॅरंटी देत आहेत. मग ते पिकांना हमीभाव देण्याची गॅरंटी का देत नाहीत. सरकारने पिकांना हमीभाव दिला पाहिजे. सरकार नोकरदारांना सातवा, आठवा वेतन आयोग लागू करतं. सरकार नोकरदारांच्या पगारांची हमी देतं. मग शेतकऱ्यांच्या पिकांना का देत नाही? म्हणून मला असं वाटतं की हे सरकार सपशेल अपयशी ठरलं आहे.आमदार बच्चू कडू म्हणाले, केंद्र सरकारने शेतकऱ्यांच्या पिकाला हमीभाव द्यावा. मी या सरकारमध्ये असलो तरी मी हेच म्हणेन की, शेतकऱ्यांच्या बाबतीत कुठलीही चांगली योजना केंद्र किंवा राज्य सरकारने आणली नाही. दोन-तीन गोष्टी सोडल्या तर चांगल्या योजना आणलेल्या नाहीत. मुळात हमीभाव दिला तर अशा योजना आखायची गरजच पडणार नाही. पिकांना हमीभाव द्यावा ही शेतकऱ्यांची रास्त मागणी आहे आणि ती मागणी सरकारने पूर्ण केली पाहिजे. प्रहारचे प्रमुख म्हणाले, आपला देश स्वतंत्र झाल्यापासून शेतकरी पिकांची हमी मागतोय. परंतु, कुठल्याच सरकारला ते करता आलेलं नाही. पूर्वी शेतकरी नेते शरद जोशी लिहायचे, 'भीक नको, घेऊ घामाचे दाम'. मलाही तेच म्हणावसं वाटतं. तसेच भिकारचोट योजना बंद करा आणि हमीभाव द्या. स्वामीनाथन आयोग संपूर्ण देशासाठी लागू झाला पाहिजे. शेतकऱ्यांना १५ टक्के नफ्यानेही भाव मिळत नाही.पिकांच्या हमीभावाला कायदेशीर आधार देण्याची प्रमुख मागणी शेतकऱ्यांनी केली आहे. तसेच स्वामीनाथन आयोगाच्या शिफारशी लागू करणे, शेतकरी आणि शेतमजूरांना पेन्शन सुरू करणे, शेतीसाठी घेतलेल्या कर्जांना माफी देणे, याआधीच्या आंदोलनात दाखल झालेले गुन्हे मागे घेणे, लखीमपूर खेरी हिंसाचारातील पीडितांना न्याय देणे, भूसंपादन कायदा २०१३ ची पुर्नस्थापना करणे, जागतिक व्यापार संघटनेच्या करारातून बाहेर पडणे आणि याआधी दिल्ली येथे झालेल्या आंदोलनात मृत्यूमुखी पडलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देणे यांसारख्या अनेक मागण्या शेतकरी संघटनांनी केल्या आहे.

### 'भीक नको, घेऊ घामाचे दाम'

आमदार बच्चू कडू यांनीदेखील शेतकऱ्यांवरील हल्ल्याचा निषेध केला आहे.यावेळी ते म्हणाले, केंद्र सरकारने शेतकऱ्यांवर केलेल्या हल्ल्याचा मी निषेध करतो. पिकांना हमीभाव मिळावा यासाठी शेतकरी आंदोलन करत आहेत. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे, पंतप्रधान नरेंद्र मोदी अनेक गोष्टींची गॅरंटी देत आहेत. मग ते पिकांना हमीभाव देण्याची गॅरंटी का देत नाहीत. सरकारने पिकांना हमीभाव दिला पाहिजे. सरकार नोकरदारांना सातवा, आठवा वेतन आयोग लागू करतं. सरकार नोकरदारांच्या पगारांची हमी देतं. मग शेतकऱ्यांच्या पिकांना का देत नाही? म्हणून मला असं वाटतं की हे सरकार सपशेल अपयशी ठरलं आहे.आमदार बच्चू कडू म्हणाले, केंद्र सरकारने शेतकऱ्यांच्या पिकाला हमीभाव द्यावा. मी या सरकारमध्ये असलो तरी मी हेच म्हणेन की, शेतकऱ्यांच्या बाबतीत कुठलीही चांगली योजना केंद्र किंवा राज्य सरकारने आणली नाही. दोन-तीन गोष्टी सोडल्या तर चांगल्या योजना आणलेल्या नाहीत. मुळात हमीभाव दिला तर अशा योजना आखायची गरजच पडणार नाही. पिकांना हमीभाव द्यावा ही शेतकऱ्यांची रास्त मागणी आहे आणि ती मागणी सरकारने पूर्ण केली पाहिजे. प्रहारचे प्रमुख म्हणाले, आपला देश स्वतंत्र झाल्यापासून शेतकरी पिकांची हमी मागतोय. परंतु, कुठल्याच सरकारला ते करता आलेलं नाही. पूर्वी शेतकरी नेते शरद जोशी लिहायचे, 'भीक नको, घेऊ घामाचे दाम'. मलाही तेच म्हणावसं वाटतं.

# सरकार जाऊदे खड्डयात, तुम्ही आधी उपचार घ्या!

## जरांगेंवर डॉक्टरांनी जबरदस्तीने सलाईन लावून उपचार सुरू केले आहेत

। मुंबई । प्रतिनिधी : महाईन्यूज

**मनोज जरांगे पाटील पुन्हा एकदा बेमुदत उपोषणाला बसले आहेत. आज (१४ फेब्रुवारी) त्यांच्या उपोषणाचा पाचवा दिवस आहे. गेल्या दोन दिवसांपासून त्यांची प्रकृतीदेखील खालावली आहे. अशातच सकाळी त्यांच्या नाकातून रक्तस्राव झाला, पाठोपाठ पोटदुखी सुरू झाली आहे. त्यामुळे मराठा आंदोलकांसह संपूर्ण समाजाला मनोज जरांगे यांची काळजी वाटू लागली आहे.**




जरांगे यांच्या काळजीने त्यांच्या समर्थकांनी आणि आंदोलकांनी आंतरवाली सराटीकडे (उपोषणस्थळी) कूच केली आहे. आज सकाळपासून आंतरवालीत गर्दी वाढू लागली आहे.नोंदी असलेल्या मराठा कुटुंबांना कुणबी जातप्रमाणपत्र द्यावं, प्रमाणपत्र असलेल्या व्यक्तीच्या शपथपत्रासह त्यांच्या सगेसोयऱ्यांचा आरक्षणात समावेश करावा, तसेच सरकारने काढलेल्या अधिसूचनेचं कायद्यात रुपांतर करावं या प्रमुख मागण्यांवर मनोज जरांगे पाटील ठाम आहेत. यासाठीच ते उपोषणाला बसले आहेत.मनोज जरांगे पाटील यांची प्रकृती खालावल्यामुळे आंदोलक आणि समाजबांधव त्यांना उपचार घेण्याची विनंती करत आहेत. दरम्यान, मनोज जरांगे यांनी आंदोलकांना भावनिक आवाहन केलं. पाटील म्हणाले, मी मेलो तर मला असंच सरकारच्या दारात नेऊन टाका आणि या सरकारला धारेवर धरा. सरकारने आपल्याला येत्या १८ ते १९ फेब्रुवारीपर्यंत आरक्षण दिलं नाही, अधिसूचनेची अंमलबजावणी केली नाही तर आपण मुंबईला जाऊ आणि सरकारला जाब विचारू. मी मेल्यावर तुम्ही सरकारला सोडू नका. मला तिकडे नेऊन टाका. सध्या आपण १८ फेब्रुवारीपर्यंत वाट बघू.दरम्यान, आंदोलक आणि सहकारी मनोज जरांगे पाटील यांनी उपचार घ्यावे यासाठी विनवण्या करत आहेत. जरांगे पाटील यांचा एक सहकारी त्यांना म्हणाला,.

### जरांगे यांची काळजी वाटू लागली

सरकार जाऊदे खड्डयात, तुम्ही आत्ता उपचार घ्या, तुम्ही किमान आमच्यासाठी स्वतःवर उपचार करून घ्या." सहकाऱ्यांचा टाहो ऐकून जरांगे पाटील त्यांना म्हणाले, त्यापेक्षा मला गाडीत टाका आणि मुंबईला न्या. आपण आता मुंबईला जाऊ. माझ्याबरोबर जास्त लोक येऊ नका. कारण जास्त आंदोलक तिकडे गेले तर ते लोक तुम्हाला अडचणीत आणतील. त्यापेक्षा मी एकटाच जातो.मनोज जरांगे पाटील पुन्हा एकदा बेमुदत उपोषणाला बसले आहेत. आज (१४ फेब्रुवारी) त्यांच्या उपोषणाचा पाचवा दिवस आहे. गेल्या दोन दिवसांपासून त्यांची प्रकृतीदेखील खालावली आहे. अशातच सकाळी त्यांच्या नाकातून रक्तस्राव झाला, पाठोपाठ पोटदुखी सुरू झाली आहे. त्यामुळे मराठा आंदोलकांसह संपूर्ण समाजाला मनोज जरांगे यांची काळजी वाटू लागली आहे.

# मी भारतमातेचा मोठा पुजारी!

## अबू धाबीतील मंदिराच्या उद्घाटनप्रसंगी पंतप्रधान मोदींचे उद्गार

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बुधवारी (१४ फेब्रुवारी) अबू धाबी येथील पहिल्या हिंदू मंदिराचं उद्घाटन केलं. हे बोचासनवासी अक्षर पुरुषोत्तम स्वामीनारायण संस्थेचं (BAPS) मंदिर आहे. या मंदिराच्या उद्घाटनानंतर पंतप्रधान मोदी यांनी उपस्थितांना संबोधित केलं. नरेंद्र मोदी यावेळी म्हणाले, माझं सौभाग्य आहे की, अयोध्येतील राम मंदिरापाठोपाठ आज मी अबू धाबीतल्या या भव्य मंदिराचं उद्घाटन केलं. माझे मित्र ब्रह्म स्वामी मघाशी म्हणत होते की, मोदी सर्वात मोठे पुजारी आहेत. मंदिराचा पुजारी होण्याइतकी माझी पात्रता आहे का? परंतु, मला एका गोष्टीचा अभिमान आहे की, मी भारतमातेचा सर्वात मोठा पुजारी आहे. परमेश्वराने मला जितकं आयुष्य दिलंय, मला जे आणि जसं शरीर दिलं आहे त्याचा प्रत्येक कण मला केवळ भारतमातेच्या सेवेसाठी समर्पित करायचा आहे. मी भारतमातेचा पुजारी आहे आणि १४० कोटी भारतीय माझे आराध्य आहेत. देशातला प्रत्येक नागरिक माझं आराध्य दैवत आहे.**



पंतप्रधान मोदी म्हणाले, आपल्या वेदांमध्ये सांगण्यात आलं आहे की 'एकम सत्यं विप्रा बहुदा वदंति', याचा अर्थ असा आहे की, ईश्वर एकच आहे, एकच सत्य आहे, परंतु विद्वान लोक त्याला वेगवेगळ्या प्रकारे आपल्यासमोर मांडतात. हे तत्वज्ञान भारताच्या मूलभूत चेतनेचा एक भाग आहे. त्यामुळेच आपण सर्वांचं स्वागत करतो. आपल्याला विविधतेतही एकात्मताच दिसते आणि हीच आपली खासियत आहे.अबू धाबी येथील पहिल्या हिंदू मंदिराचं आज लोकार्पण पार पडलं. हे BAPS मंदिर दगडी वास्तुकलेने तयार करण्यात आलं आहे. हे आखाती प्रदेशातील सर्वात मोठं मंदिर आहे. २०१५ मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या पहिल्या UAE भेटीदरम्यान तिथल्या सरकारने अबुधाबीमध्ये मंदिर बांधण्यासाठी जमीन देण्याचा निर्णय घेतला. मोदी यांनी फेब्रुवारी २०१८ मध्ये मंदिर प्रकल्पाचे उद्घाटन केले आणि डिसेंबर २०१९ मध्ये त्याचे बांधकाम सुरू झाले.

मंदिराचा अभिषेक सोहळा १४ फेब्रुवारी २०२४ रोजी पवित्र वसंत पंचमीच्या दिवशी पार पडला.दरम्यान, मोदी यांच्या या यूएई दौऱ्यावेळी त्यांनी यूएईचे अध्यक्ष शेख मोहम्मद बिन झायेद अल नाह्यान यांच्याशी द्विपक्षीय बैठकी घेतली. दोन्ही नेत्यांनी देशांमधील धोरणात्मक भागीदारी अधिक सखोल, विस्तारित आणि मजबूत करण्याच्या मार्गांवर चर्चा केली. तसेच परस्पर हिताच्या प्रादेशिक आणि आंतरराष्ट्रीय मुद्द्यांवर विचारांची देवाणघेवाण झाली. मोदी हे दुबई येथे होणाऱ्या वर्ल्ड गव्हर्नमेंट समिट २०२४ मध्ये प्रमुख पाहुणे म्हणून सहभागी होणार आहेत.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज (14 फेब्रुवारी) संयुक्त अरब अमिरातीमधील पहिलं हिंदू मंदिर असलेल्या अबुधाबीमध्ये बोचासनवासी अक्षर पुरुषोत्तम स्वामीनारायण संस्थेच्या हिंदू मंदिराचे लोकार्पण केले.

मंदिर लोकार्पणापूर्वी पंतप्रधान मोदी यांनी मंदिर परिसरात आभासी गंगा आणि यमुना नद्यांमध्ये जल अर्पण केले आणि नंतर मंदिराच्या प्रार्थना करण्यासाठी मार्गस्थ झाले. अबू धाबीमध्ये 27 एकरच्या जागेवर गुलाबी वाळूच्या दगडातील मंदिर आहे, जे मध्य पूर्वेतील सर्वात मोठे मंदिर आहे. इस्लाम हा UAE चा अधिकृत धर्म असताना, देशात सुमारे 36 लाख भारतीय कामगार राहतात. मंदिराच्या उद्घाटन समारंभासाठी आलेल्या पाहुण्यांच्या यादीत भारतीय सरकारी अधिकारी, बॉलीवूड तारे आणि अब्जाधीश अंबानी कुटुंबातील सदस्यांचा समावेश होता.

अबुधाबीचे वरिष्ठ अधिकारीही उपस्थित होते.अलीकडील काळात पंतप्रधान मोदींच्या हस्ते उद्घाटन होणारे हे दुसरे मोठे धार्मिक स्थळ आहे. जानेवारीमध्ये, त्यांनी अयोध्येतील भव्य राम मंदिराच्या अभिषेक समारंभाचे अध्यक्षपद भूषवले, जे 16 व्या शतकातील मशिदीच्या जागेवर बांधले गेले होते. यासाठी प्रदीर्घ न्यायालयीन लढाई झाली होती. पंतप्रधान मोदी म्हणाले, आपल्या वेदांमध्ये सांगण्यात आलं आहे की 'एकम सत्यं विप्रा बहुदा वदंति', याचा अर्थ असा आहे की, ईश्वर आहे.

### मंदिर दगडी वास्तुकलेने तयार

» हे तत्वज्ञान भारताच्या मूलभूत चेतनेचा एक भाग आहे. त्यामुळेच आपण सर्वांचं स्वागत करतो. आपल्याला विविधतेतही एकात्मताच दिसते आणि हीच आपली खासियत आहे.अबू धाबी येथील पहिल्या हिंदू मंदिराचं आज लोकार्पण पार पडलं. हे BAPS मंदिर दगडी वास्तुकलेने तयार करण्यात आलं आहे. हे आखाती प्रदेशातील सर्वात मोठं मंदिर आहे. २०१५ मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या पहिल्या UAE भेटीदरम्यान तिथल्या सरकारने अबुधाबीमध्ये मंदिर बांधण्यासाठी जमीन देण्याचा निर्णय घेतला. मोदी यांनी फेब्रुवारी २०१८ मध्ये मंदिर प्रकल्पाचे उद्घाटन केले आणि डिसेंबर २०१९ मध्ये त्याचे बांधकाम सुरू झाले. मंदिराचा अभिषेक सोहळा १४ फेब्रुवारी २०२४ रोजी पवित्र वसंत पंचमीच्या दिवशी पार पडला.दरम्यान, मोदी यांच्या या यूएई दौऱ्यावेळी त्यांनी यूएईचे अध्यक्ष शेख मोहम्मद बिन झायेद अल नाह्यान यांच्याशी द्विपक्षीय बैठकी घेतली. दोन्ही नेत्यांनी देशांमधील धोरणात्मक भागीदारी अधिक सखोल, विस्तारित आणि मजबूत करण्याच्या मार्गांवर चर्चा केली. तसेच परस्पर हिताच्या प्रादेशिक आणि आंतरराष्ट्रीय मुद्द्यांवर विचारांची देवाणघेवाण झाली. मोदी हे दुबई येथे होणाऱ्या वर्ल्ड गव्हर्नमेंट समिट २०२४ मध्ये प्रमुख पाहुणे म्हणून सहभागी होणार आहेत.

# माजी पंतप्रधान आणि त्यांच्या पत्नी यांनी स्वीकारलं स्वेच्छामरण!

## 93 व्या वर्षी एकमेकांचे हात हातात घेत दिला जगाचा निरोप

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**नेदरलँडचे माजी पंतप्रधान ड्राइस व्हेन एग्त आणि त्यांच्या पत्नी यूजीन या दोघांनीही वयाच्या ९३ व्या वर्षी इच्छामरण स्वीकारलं आहे. हे दोघंही प्रदीर्घ काळापासून आजारी होते. त्यामुळे त्यांनी डॉक्टरांच्या मदतीने इच्छामरणाचा स्वीकार करत आणि हातात हात घेत जगाचा निरोप घेतला आहे. या दोघांचेही मृतदेह शेजारी शेजारीच दफन करण्यात आले आहेत.**

ड्राइस वेग्त यांचं त्यांच्या पत्नीवर खूप प्रेम होतं. यूजीन यांनी काही वर्षांपूर्वी सांगितलं होतं की एग्त मला आजही 'माय गर्ल' असं म्हणतात.ड्राइस एग्त हे १९७७ ते १९८२ या कालावधीत नेदरलँडचे पंतप्रधान होते. ते ख्रिश्चियन डेमोक्रेटिक पक्षाचे सदस्य होते. नेदरलँड हा असा देश आहे ज्या देशात २००० मध्ये इच्छामरणाला कायदेशीर मान्यता मिळाली आहे. त्यामुळे या ठिकाणी राहणारे नेदरलँडचे नागरिक हे इच्छामरण मागू शकतात.जे खूप आजारी झाले आहेत, ज्यांच्यावर आता उपचार होणंही अशक्य आहे किंवा ज्यांच्या



प्रकृतीत काहीही सुधारणा होणं कठीण आहे असे लोक इच्छामरण मागू शकतात.एग्त आणि यूजीन हे ६८ वर्षे एकमेकांबरोबर होते. त्यानंतर त्यांनी स्वतःच इच्छामरणाचा निर्णय घेतला. त्यासाठी ५ फेब्रुवारी २०२३ ही तारीखही निश्चित केली.एग्त यांना २०१९ मध्ये एका सेमिनारमध्ये भाषण देत असताना ब्रेन हॅमरेज झालं होतं. अनेकदा ते पक्षविरोधी भूमिका घेत त्यामुळे त्यांच्यावर टीका व्हायची. २०१७ मध्ये त्यांनी हा पक्ष सोडला होता. एग्त इस्रायल विरोधी आणि पॅलेस्टाईनचे कट्टर समर्थक होते. या दोघांना तीन मुलं आहेत.नेदरलँडमध्ये इच्छामरणाला कायदेशीर मान्यता आहे. ज्यांना इच्छामरण हवं आहे त्यांच्याकडे डॉक्टर येतात. शेवटची प्रक्रिया ही त्या संबंधित व्यक्तीच्या घरीच केली जाते.

### 93 व्या वर्षी इच्छामरण स्वीकारलं

» या वेळी डॉक्टर रुग्णाला एक खास प्रकारचं इंजेक्शन देतात. ज्यानंतर काही मिनिटांमध्ये रुग्णाचा मृत्यू होतो. या प्रकरणात अशीही तरतूद आहे की जर एखाद्याच्या इच्छा मृत्यूवर कुणी प्रश्न उपस्थित केला आणि डॉक्टरांनी निष्काळजीपणा केला असल्याचं किंवा हलगर्जीपणा केल्याचं लक्षात आलं तर डॉक्टरांना १२ वर्षांची शिक्षा होऊ शकते. २०२२ मध्ये नेदरलँडमध्ये ८ हजार ५०० लोकांनी इच्छा मरण स्वीकारलं होतं. नेदरलँडचे माजी पंतप्रधान ड्राइस व्हेन एग्त आणि त्यांच्या पत्नी यूजीन या दोघांनीही वयाच्या ९३ व्या वर्षी इच्छामरण स्वीकारलं आहे. हे दोघंही प्रदीर्घ काळापासून आजारी होते. त्यामुळे त्यांनी डॉक्टरांच्या मदतीने इच्छामरणाचा स्वीकार करत आणि हातात हात घेत जगाचा निरोप घेतला .

# रकूल प्रीत आणि जॅकी भगनानी लग्नाच्या बेडीत अडकणार

बॉलिवूड अभिनेत्री रकुल प्रीत सिंग आणि अभिनेता जॅकी भगनानी 21 फेब्रुवारी रोजी विवाहबंधनात अडकणार आहेत. गेल्या अनेक दिवसांपासून रकुल प्रीत आणि जॅकीच्या विवाहस्थळापासून ते हनीमूनपर्यंत चर्चा रंगल्या आहेत. पीएम मोदींच्या आवहानानंतर रकुल आणि जॅकीने भारतात करण्याचे ठरविले. त्यांचा विवाहासाठी कुटुंबीय आणि त्यांचे निकटवर्तीय उपस्थित असणार आहेत. विवाह पार पडल्यानंतर रात्री पार्टीचे नियोजनही असणार आहे. 20 फेब्रुवारीला हळदी समारंभ पार पडेल. विवाहाला हजर राहणाऱ्या एका पाहुण्याने याबाबत खुलासा केलाय. इंडिया टुडेच्या रिपोर्टनुसार, रकुल प्रीत आणि जॅकी भगनानी यांचा विवाह सोहळा दक्षिण गोव्यातील एका आलीशान हॉटेलमध्ये पार पडणार आहे. आयटीसी ग्रँड या हॉटेलमध्ये दोघांचा विवाह पार पडेल. या डेस्टिनेशन विवाह सोहळ्यासाठी पाहुण्याची आणि निकटवर्तीयांची उपस्थिती असणार आहे. जोडप्याच्या एका निकटवर्तीयाने सांगितले की, दोघांनी गोव्यातील आयटीसी ग्रँड या हॉटेलमध्ये हा विवाह पार पडेल. गोव्यातील शांत वातावरणात विशाल संपत्तीत हा सोहळा पार पडेल. हा सेलीब्रेशनसाठी हे ठिकाण परफेक्ट आहे. रकुल प्रीत सिंग



आणि जॅकी भगनानी यांच्याबाबत एक मोठी बातमी समोर आली आहे. विदेशात जाऊन विवाहबंधनात अडकण्याचा रकुल आणि जॅकीचा प्लॅन होता. मात्र, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारतातील डेस्टिनेशन वेडिंगसाठी महत्वपूर्ण असलेल्या लोकेशनबाबत भाष्य केले. त्यानंतर पीएम मोदींनी याबाबत लोकांना आवाहन देखील केले. पीएम मोदींनी आवाहन करताच रकुल आणि जॅकीने विवाहस्थळ बदलले आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, मिडल ईस्टमध्ये जाऊन विवाहबंधनात अडकण्याचा रकुल प्रीतचा प्लॅन होता. 6 महिने विचार करुन तिने योजना आखली होती. त्यानंतर डिसेंबर महिन्यात पीएम मोदींनी डेस्टिनेशन वेडिंगसाठी भारतातीलच ठिकाणे निवडण्याचे आवाहन केले होते. त्यामुळ रकुल आणि जॅकीने आता भारतातच विवाह करण्याच निर्णय घेतला आहे.

## तुमच्या बरोबर झालंय का कधी असं?

चला हवा येऊ द्या' या कार्यक्रमातून घराघरात पोहोचलेल्या कुशल बद्रिकेने आपल्या विनोदाच्या अचूक टाइमने प्रेक्षकांच्या मनात अटळ स्थान निर्माण केलं आहे. त्याने आपल्या सहजसुंदर अभिनय आणि विनोदी शैलीच्या जोरावर मराठी सिनेसृष्टीत स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यामुळे कुशलचा एक वेगळा चाहता वर्ग तयार झाला आहे. नुकतीच कुशलने व्हेलेंटाइन डेनिमित्ताने बायकोसाठी एक खास पोस्ट शेअर केली आहे. अभिनेत्याच्या या पोस्टने सगळ्यांचं लक्ष वेधून घेतलं आहे.अभिनेता कुशल बद्रिकेने बायको सुनयना बद्रिकेचा पोस्ट शेअर करत ही पोस्ट लिहिली आहे. "तुमच्या बरोबर झालंय का कधी असं? की एखादं माणूस आपल्या समोर येतं आणि जगात फक्त आपलंच घड्याळ स्लो मोशनमध्ये धावायला लागतं, न्यूटनने लावलेला गुरुत्वाकर्षणाचा शोध फाट्यावर मारून आपण तरंगूच लागतो एकदम.

## जुई संतापली

ठाण्यात मुक्या प्राण्यांच्या ग्रूमिंग सेशन सेंटरमध्ये कर्मचाऱ्याने एका श्वानाला मारहाण केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. हा व्हिडीओ अनेक प्राणीप्रेमी संस्थांकडून व्हायरल करण्यात आला असून संबंधित कंपनी व कर्मचाऱ्यावर कारवाई करण्याची मागणी केली जात आहे. पाळीव प्राण्यांची शुश्रूषा करणाऱ्या सेंटरमधील हा धक्कादायक प्रकार पाहून कलाविश्वातील अनेक कलाकारांनी प्रतिक्रिया दिल्या आहेत. रितेश देशमुख पाठोपाठ अभिनेत्री जुई गडकरीने इन्स्टाग्राम पोस्ट शेअर करत घडल्या प्रकाराबद्दल संताप व्यक्त केला आहे."एका स्पा सेंटरमध्ये श्वानाला कर्मचाऱ्याने मारहाण केल्याचा व्हिडीओ सध्या मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. हा व्हिडीओ अतिशय अस्वस्थ करणारा आहे. मी तो व्हिडीओ पूर्ण पाहू देखील शकले नाही. मारहाण करणाऱ्या त्या मनोरुग्णाला देव चांगलीच शिक्षा करेल...ज्या हातांनी त्याने मुक्या जीवाला मारहाण केली ते हात काही दिवसांत काहीच कामाचे राहणार नाहीत. हा अत्याचार थांबवा, त्या कर्मचाऱ्याला अटक करून कठोर शिक्षा करा. मी आशा करते की, तो श्वान आता सुरक्षित असेल.



## शिवाच्या 'त्या' दृष्यावर नेटकरी चवताळले!

छोट्या पडद्यावर सध्या टीआरपीची जोरदार शर्यत सुरू आहे. 'झी मराठी'ने नुकत्याच दोन नव्या मालिका सुरू केल्या आहेत. पहिल्याच दिवशी तांत्रिक कारणाने प्रसारीत न झालेली मालिका शिवा ही मालिका मंगळवारी प्रसारीत झाली. मात्र, या मालिकेतील एक दृष्य सोशल मीडियावर चर्चेत आले आहे. या दृष्यावर नेटकऱ्यांनी 'झी मराठी'च्या मालिकेला ट्रोल करण्यास सुरुवात केली आहे. विशेष म्हणजे हे दृष्य झी मराठीने आपल्या सोशल मीडिया हँडलवर पोस्ट केले आहे. मालिकेच्या या एपिसोडमध्ये आशुने दिव्याला इम्प्रेस करण्यासाठी हातात विषारी साप पकडल्याचं दाखवलं आहे. वीएफएक्सच्या माध्यमातून हा साप दाखवण्यात आला आहे. मात्र, त्यावर नेटकऱ्यांनी त्याची थट्टा उडवण्यास सुरुवात केली आहे.झी मराठीने पोस्ट केलेल्या शिवा मालिकेतील या दृष्यावर नेटकऱ्यांनी टीकेची झोड उठवण्यास सुरुवात केली आहे. एका युजरने कार्टून दाखवताय का लहान मुलांना? असा सवाल केला आहे. तर आणखी एका युजरने 'कार्टून पण यापेक्षा चांगल दाखवतात, असे म्हणत मालिकेतील व्हीएफएक्सच्या दर्जावर प्रश्न उपAस्थित केले. एका युजरने 'सातव्या मुलीची सातवी मुलगी'मधला नाग आता झीवरच्या इतर सगळ्या मालिकांमध्ये वापर करणार वाटतं, असे म्हटले. तर, काहींनी जुन्या मालिकाच दर्जेदार असल्याचे म्हटले. एका युजरने 'काय फालतू मालिका आहे, बंद करा काहीही दाखवतात', अशी संतप्त प्रतिक्रिया दिली आहे. 'शिवा' ही मालिका ही ओडिया मालिका 'सिंदूरा बिंदू' या मालिकेचा रिमेक आहे. ही मालिका 'मीत' या नावाने हिंदीत प्रसारीत झाली होती. मात्र, या मालिकेतील एक दृष्य सोशल मीडियावर चर्चेत आले आहे. या दृष्यावर नेटकऱ्यांनी 'झी मराठी'च्या मालिकेला ट्रोल करण्यास सुरुवात केली आहे.

## असं' पार पडलं अमृता देशमुखचं हळदी कुंकू

अभिनेत्री अमृता देशमुख आणि प्रसाद जवादे यांचा लग्नसोहळा १८ नोव्हेंबर २०२३ रोजी थाटामाटात पार पडला. या जोडप्याच्या लग्नाला जवळच्या नातेवाईकांसह अनेक मराठी कलाकारांनी हजेरी लावली होती. लग्नानंतरचा प्रत्येक सण प्रसाद-अमृता मोठ्या उत्साहाने साजरा करत आहेत. नुकतीच अभिनेत्रीने तिच्या लग्नानंतरच्या पहिल्या हळदी-कुंकू समारंभाची झलक चाहत्यांबरोबर शेअर केली.अमृताने हळदी-कुंकू समारंभासाठी खास पारंपरिक लूक केला होता. गळ्यात नाजूक असा हार, साधं अन् सुंदर मंगळसूत्र, केसात गजरा, नाकात गोलाकार नथ आणि या शृंगाराला शोभेल अशी गुलाबी रंगाची साडी अभिनेत्रीने नेसली होती. याशिवाय अमृताने परिधान केलेलं हल्यावाचं मंगळसूत्र यामध्ये विशेष उठून दिसत होतं.अभिनेत्री ही पोस्ट शेअर करत लिहिते, "घरचं हळदी कुंकू...मी थकुन बसले होते...ही माहेरची साडी आहे. कारण, अखिल भारतीय नाट्य परिषद, जळगाव...यांनी मला ती खास 'खान्देश कन्या' म्हणून भेट दिली आहे. या साडीवर खास ही आगळी वेगळी नथ डिझाइन करून घेतली आहे."दरम्यान, अमृताच्या या सुंदर लूकवर नेटकऱ्यांनी कौतुकाचा वर्षाव केला आहे. अभिनेत्रीचा हा मराठमोळा लूक प्रत्येकाच्या पसंतीस उतरला आहे. तिचा पती अभिनेता प्रसाद जवादेने देखील बायकोच्या हळदी-कुंकू समारंभातील काही फोटो इन्स्टाग्रामवर शेअर करत तिचं कौतुक केलं होतं.अभिनेत्री अमृता देशमुख आणि प्रसाद जवादे यांचा लग्नसोहळा १८ नोव्हेंबर २०२३ रोजी थाटामाटात पार पडला. या जोडप्याच्या लग्नाला जवळच्या नातेवाईकांसह अनेक मराठी कलाकारांनी हजेरी लावली होती. लग्नानंतरचा प्रत्येक सण प्रसाद-अमृता मोठ्या उत्साहाने साजरा करत आहेत.



# मी म्हटलं, पैसे घे, धोनीने नकार दिला

## BAS च्या मालकांनी सांगितला माहीचा मनं जिंकणारा किस्सा

नवी दिल्ली ।
। वृत्तसंस्था

**भारतीय क्रिकेट संघाचा माजी कर्णधार महेंद्रसिंह धोनीला निवृत्त होऊन चार वर्षे उलटली आहेत. तरी धोनी सतत त्याच्या क्रिकेट आणि क्रिकेटव्यतिरिक्त गोष्टींमुळे चर्चेत असतो. तो इंडियन प्रीमियर लीगमधून अद्याप निवृत्त झालेला नाही. दरम्यान, धोनीच्या २०१९ च्या विश्वचषक स्पर्धेच्या वेळी घडलेली धोनीबाबतची एक गोष्ट समोर आली आहे. २०१९ च्या विश्वचषक स्पर्धेच्या उपांत्य सामन्यात भारताला न्यूझीलंडने पराभूत केलं होतं. तोच धोनीचा आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधला शेवटचा सामना होता. त्या विश्वचषक स्पर्धेत धोनी त्याच्या बॅटवर BAS कंपनीचं स्टिकर लावून खेळत होता. या स्टिकरमागे एक रोचक गोष्ट आहे.**



BAS कंपनीचे मालक सोमी कोहली यांनी नुकतीच ही गोष्ट शेअर केली आहे. कोहली यांनी सांगितलं की, धोनीने त्यावेळी कुठल्याही प्रकारचं शुल्क न आकारता त्याच्या बॅटवर BAS चा लोगो आणि स्टिकर लावलं होतं. त्याऐवजी धोनीने दुसऱ्या एखाद्या कंपनीशी करार करून त्या कंपनीचं स्टिकर आणि लोगो लावला असता तर त्याला कोट्यवधी रुपये मिळाले असते. समाजमाध्यमांवर एक व्हिडीओ व्हायरल होत आहे. ज्यामध्ये BAS चे मालक सोमी कोहली यांनी सांगितलं की, धोनी आमच्याकडे आला आणि म्हणाला की मला BAS चं स्टिकर माझ्या बॅटवर लावून खेळायचं आहे. मी धोनीला त्यासाठी पैसे देऊ केले. परंतु, त्याने पैसे घेण्यास नकार दिला. मी धोनीला म्हटलं की प्लीज माझ्याकडून या जाहिरातीचे पैसे घे. परंतु, त्याने नकार दिला. मी धोनीची पत्नी साक्षी आणि त्याच्या आई-वडिलांनाही सांगितलं की, धोनीने माझ्याकडून पैसे घ्यायला हवेत. परंतु, धोनी स्पष्ट शब्दांत पैसे घेण्यास नकार दिला. धोनी जेव्हा स्टार क्रिकेटपटू नव्हता तेव्हा BAS ने धोनीची आर्थिक मदत केली होती. त्यामुळेच धोनीने तो स्टार क्रिकेटपटू झाल्यानंतर BAS कडून पैसे घेतले नाहीत. धोनी सध्या आयपीएल २०२४ ची तयारी करत आहे. स्पर्धेच्या आधी तो नेट्समध्ये अनेक तास सराव करतोय. फलंदाजी आणि यष्टीरक्षणाच्या सरावासाठी, फिट राहण्यासाठी मैदानावर घाम गाळताना दिसतोय.महेंद्रसिंह धोनी अनेक वर्षे राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये ७ क्रमांक असलेली जर्सी घालून खेळत आला आहे. तो अजूनही आयपीएलमध्ये याच क्रमांची जर्सी वापरतोय. दरम्यान,धोनीने नुकतंच एका कार्यक्रमात जर्सीसाठी ७ हा क्रमांक का निवडला यामागचं कारण स्पष्ट केलं. धोनी म्हणाला, मी पृथ्वीवर पाऊल ठेवण्यासाठी माझ्या आई-वडिलांनी ७ जुलै १९८१ हा दिवस ठरवला होता. मी सातव्या महिन्यातील सातव्या दिवशी जन्मलो. १९८१ हे वर्ष होतं. ८ मधून १ हा अंक वजा केला तर ७ हे उत्तर येतं. म्हणून मी ७ नंबरची जर्सी निवडली. जेव्हा मला विचारण्यात आलं की, तू कुठल्या क्रमांकाची जर्सी परिधान करणार? तेव्हा जर्सीचा क्रमांक ठरवणं माझ्यासाठी खूप सोपं होतं. धोनीने दुसऱ्या एखाद्या कंपनीशी करार करून त्या कंपनीचं स्टिकर आणि लोगो लावला असता तर त्याला कोट्यवधी रुपये मिळाले असते. समाजमाध्यमांवर एक व्हिडीओ व्हायरल होत आहे. ज्यामध्ये BAS चे मालक सोमी कोहली यांनी सांगितलं की, धोनी आमच्याकडे आला आणि म्हणाला की मला BAS चं स्टिकर माझ्या बॅटवर लावून खेळायचं आहे. मी धोनीला त्यासाठी पैसे देऊ केले. परंतु, त्याने पैसे घेण्यास नकार दिला. मी धोनीला म्हटलं की प्लीज माझ्याकडून या जाहिरातीचे पैसे घे. परंतु, त्याने नकार दिला. मी धोनीची पत्नी साक्षी आणि त्याच्या आई-वडिलांनाही सांगितलं की, धोनीने माझ्याकडून पैसे घ्यायला हवेत. परंतु, धोनी स्पष्ट शब्दांत पैसे घेण्यास नकार दिला. धोनी जेव्हा स्टार क्रिकेटपटू नव्हता तेव्हा BAS ने धोनीची आर्थिक मदत केली होती. त्यामुळेच धोनीने तो स्टार क्रिकेटपटू झाल्यानंतर BAS कडून पैसे घेतले नाहीत. धोनी सध्या आयपीएल २०२४ ची तयारी करत आहे. स्पर्धेच्या आधी तो नेट्समध्ये अनेक तास सराव करतोय.

### धोनी निवृत्त झालेला नाही

» फलंदाजी आणि यष्टीरक्षणाच्या सरावासाठी, फिट राहण्यासाठी मैदानावर घाम गाळताना दिसतोय.महेंद्रसिंह धोनी अनेक वर्षे राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये ७ क्रमांक असलेली जर्सी घालून खेळत आला आहे. तो अजूनही आयपीएलमध्ये याच क्रमांची जर्सी वापरतोय. भारतीय क्रिकेट संघाचा माजी कर्णधार महेंद्रसिंह धोनीला निवृत्त होऊन चार वर्षे उलटली आहेत. तरी धोनी सतत त्याच्या क्रिकेट आणि क्रिकेटव्यतिरिक्त गोष्टींमुळे चर्चेत असतो. तो इंडियन प्रीमियर लीगमधून अद्याप निवृत्त झालेला नाही. दरम्यान, धोनीच्या २०१९ च्या विश्वचषक स्पर्धेच्या वेळी घडलेली धोनीबाबतची एक गोष्ट समोर आली आहे.

# किशनच्या वर्तणुकीमुळे ‘बीसीसीआय’ला जाग!

## ‘आयपीएल’ सहभागासाठी रणजी खेळणे अनिवार्य शक्यता

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारताचा यष्टिरक्षक-फलंदाज इशान किशन प्रथमश्रेणी क्रिकेट खेळण्यास टाळाटाळ करत असल्याने भारतीय क्रिकेट नियामक मंडळ (बीसीसीआय) आता कठोर पावले उचलण्याची शक्यता आहे. मात्र, याचा त्याच्यासह सर्व खेळाडूंवर परिणाम होणार आहे. सध्याच्या ट्वेन्टी-२०च्या जमान्यात भारताच्या बहुतांश खेळाडूंकडून इंडियन प्रीमियर लीगला (आयपीएल) प्राधान्य दिले जाते.**

परंतु ‘आयपीएल’मध्ये सहभाग नोंदवयाचा असल्यास आधी खेळाडूंना किमान तीन-चार रणजी सामने खेळणे अनिवार्य करण्याचा ‘बीसीसीआय’ विचार करत आहे.किशन गेल्या काही काळापासून भारतीय संघापासून दूर आहे. तसेच रणजी करंडकात झारखंडचे प्रतिनिधित्व करणेही त्याने टाळले आहे. त्याच्या अनुपस्थितीत झारखंडचा संघ अ-गटात शेवटून दुसऱ्या स्थानावर आहे. त्याने देशांतर्गत क्रिकेट खेळण्यापेक्षा आपला ‘आयपीएल’ संघ मुंबई इंडियन्सचा कर्णधार हार्दिक पंड्यासह बडोदा येथे सराव करणे पसंत केले आहे. मात्र, ही बाब ‘बीसीसीआय’ला फारशी आवडलेली नाही. ‘बीसीसीआय’ने किशनला रणजी करंडकातील अखेरचा साखळी सामना खेळण्याची सूचना केली आहे. झारखंडचा अखेरचा सामना १६



फेब्रुवारीपासून राजस्थानविरुद्ध रंगणार आहे. युवा खेळाडूंनी केवळ ‘आयपीएल’चा विचार करू नये यासाठी आता कठोर नियम करणे गरजेचे झाले आहे, असा ‘बीसीसीआय’मध्ये मतप्रवाह आहे. “काही खेळाडू प्रथमश्रेणी क्रिकेटकडे पूर्णपणे दुर्लक्ष करतात हे ‘बीसीसीआय’मधील निर्णयकर्त्यांना ठाऊक आहे. हे खेळाडू भारतीय संघातून बाहेर असल्यास मुश्ताक अली ट्वेन्टी-२० स्पर्धेचे काही सामने खेळतात. मात्र, आपल्या राज्याच्या संघांसाठी लाल चेंडूंचे सामने खेळण्याची त्यांची तयारी नसते. अशा खेळाडूंवर वचक ठेवण्यासाठी आयपीएल’मध्ये सहभाग नोंदवायचा असल्यास खेळाडूंना किमान तीन-चार रणजी सामने खेळणे बंधनकारक केले जाऊ शकेल.

### हार्दिकला वेगळा न्याय?

» ‘आयपीएल’ सहभागासाठी रणजी करंडकात खेळणे अनिवार्य करण्याचा विचार असला, तरी यातून काही खेळाडूंना सूट मिळू शकेल. यात अष्टपैलू हार्दिक पंड्याचे नाव आघाडीवर आहे. “प्रथमश्रेणी क्रिकेट खेळणे हार्दिकला शारिरीकदृष्ट्याच शक्य होऊ शकणार नाही. तो ‘आयसीसी’च्या स्पर्धांसाठी पूर्णपणे तंदुरुस्त असावा असे भारतीय संघाला वाटते. त्यामुळे त्याला हा नियम लागू होणार नाही. काही युवकांची गोष्ट वेगळी आहे. त्यांच्याशी संपर्क केला असता आपण तंदुरुस्तीवर काम करत असल्याचे त्यांच्याकडून सांगितले जाते.या दोन मोठ्या स्पर्धांमध्ये फारसा कालावधी नसला, व्यवस्थापनाबाबत ‘बीसीसीआय’कडून ‘आयपीएल’ फ्रेंचायझींना कोणत्याही सूचना केल्या जाणार नसल्याचे ‘बीसीसीआय’च्या अधिकाऱ्याने स्पष्ट केले.